नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/09/2023 (सोमवार) दुपार

## गिट्टीचुरीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण १०,४०,८००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त
## पोलीस स्टेशन सावनेर ची कारवाई

दिनांक २४/०९/२०२३ रोजीचे १२.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, पांटणसावगी शिवार पांटणसावंगी टोल नाकावरून गिट्टीचुरीची चोरटी वाहतुक ट्रकने होत आहे. अशा माहितीवरून पाटणसावंगी शिवार पांटगसावंगी टोल नाकावर दहा चक्का पिवळया रंगाचा ट्रक क्र. एम.एच.–४०/बीजी–७५७४ येंतांना दिसला. त्यांना थांबवुन विचारपुस केली असता मालक यांचा सांगण्यावरून बेकायदेशिररित्या बिनापरवाना शासनाचा कर चुकवून अवैधरित्या गौण खनीज, गीट्टी चुरीची कुठुन तरी चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपी ट्रक चालक **नामे— दिनेश उर्फ उत्हास येसने व मालक नामे— राजेन्द्र पवनीकर, रा. खापरखेडा** यांच्या ताब्यातून ट्रक किंमती १००,००,००/—रू व तसेच ४ ब्रास गिट्टीचुरी किंमती ४०,८००/— रू. असा एकुण १०,४०,८००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोशि/अंकुश मुळे, ब. नं. ५४९ पो.स्टे सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद केला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे पो.स्टे सावनेर मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## कोळसा चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील शहिद चौक कन्हान येथे दिनांक २४/०९/२०२३ चे ११/३० वा. ते १२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शुभम क्षीरसागर बाजारे, वय २८ वर्ष, रा. एकमत नगर बेसा रोड नागपुर नौकरी सेक्युरिटी गार्ड इंदर कामठी खदान हे खदान परिसरात पेट्रोलिंग करीत असता मारोती कार क्र. एम एच ३१/बीबी—२२०४ कार मध्ये एक इसम खदान मधुन कोळसा कार मध्ये भरुन चोरुन नेतांना दिसला यावरुन फिर्यादी याने पाठलाग केला असता कार चालक मिळुन आला नाही. सदर माहिती हि कन्हान पोलीस स्टेशनला दिली असता कन्हान पोलीसांनी सदर कार चालक आरोपी नामे— विजय धनोटे वय २५ वर्ष रा कांद्री कन्हान याला शहीद चौक कन्हान येथे पकडुन फिर्यादीला माहिती दिली यावरुन फिर्यादीने सदर वाहनाची पाहणी करुन सदर वाहनामध्ये असलेल्या कोळसा कोल डेपो मध्ये वजन काटा करुन जमा केला व कोळशाचे वजन ८१० किलो किंमती ४८६०/— रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ काटे/६४३ पोलीस स्टेशन कन्हान मो. नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर